MHAH220006832020

# नियमित दि. दावा क्र.१०६/२०२० मधील अर्ज नि.क्र.२६ व २८ वरील संयुक्तीक आदेश

**गोरख मोतीराम गदादे.**
**विरुद्ध**
**विश्वनाथ श्रीराम गदादे व इतर.**

(दिनांक २३/०२/२०२६)

१. वादीच्या वारसांनी प्रस्तुतचे अर्ज वादी गोरख मोतीराम गदादे याचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी (नि.क्र.२८) आणि अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी (नि.क्र.२६) दाखल केलेले आहेत.

२. अर्जदारांच्या म्हणण्यानुसार, सदर दावा वादीने प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीची मोजणी करुन मिळणेसाठी व मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. दि.१३/०५/२०२१ रोजी वादी गोरख मोतीराम गदादे हे मयत झाले असून मयत वादीस फक्त दोन मुले महादेव व संतोष हेच एकमेव वारस आहेत. वादीच्या वडीलांच्या मृत्युनंतर त्यांना आधार नसल्याने ते दुःखाने खचुन गेले तसेच वादीचे वारस महादेव यांचे गुडघ्याचे ऑपरेशन झाल्याने त्यांनाही बरे नव्हते. तसेच कोर्टातील दाव्याची माहिती उशीरा कळाल्याने वारस रेकॉर्डवर घेणेकामी उशीर झालेला आहे. त्यामुळे सदर मयत वादीचे वारस दाव्याचे कामकाज गुणदोषावर चालण्याकामी वादपटलावर घेणे आवश्यक व गरजेचे आहे. सबब, सदर मयत वादीचे वारस मुदतीत वादपटलावर न घेतल्यामुळे झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द व्हावा व त्याकामी झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे. सबब, सदर मयत वादीचे वारस अभिलेखावर दाखल करुन घेणेसाठी झालेला विलंब माफ व्हावा व अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सदर अर्जांवर म्हणणे दाखल केले. वादीने मुखत्यारपत्राने सदरचा दावा दाखल केला आहे. वादीचा दावा मनाई हुकूमाचा आहे. वादीने सर्व वारस नमुद केलेले नसून मृत्यूपत्र दाखल नाही. अबेटमेंट सेट असाईडसाठी पुरेसे कारण नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

४. प्रस्तुतचे अर्ज व म्हणणे वाचले. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीची मोजणी करुन मिळणेसाठी व मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदर मयत वादी गोरख मोतीराम गदादो हे दि.१३/०५/२०२१ रोजी मयत झाल्याचे विवादीत नाही. अर्जदारांना कोर्टातील दाव्याची माहिती उशीरा कळाल्याने वादीचे वारस वादपटलावर घेण्याची कार्यवाही करण्यात आली नाही, हे अर्जदारांचे कथन नाकारण्याइतपत पुरेसे कारण वादपटलावर दिसून येत नाही. अशा परिस्थितीत प्रस्तुत दाव्याचे स्वरुप व विलंबासाठी अर्जदारांनी दिलेले कारण या बाबी विचारात घेता अर्जदारांना वादीचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब व दावा अपशमित (abated) झालेबाबतचा आदेश रद्द करणे न्यायोचित ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. सदरील अर्जदारांचा अर्ज (नि.क्र.२६ व २८) मंजुर करण्यात येत आहेत.

२. मयत वादी गोरख मोतीराम गदादे याचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात आलेला आहे. तसेच, सदर वादी गोरख मोतीराम गदादे याचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतलेबाबत झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

SHIVAJI N THAPEKAR
Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.02.23 11:40:28 +0530

ठिकाण: कर्जत (एस.एन.थापेकर)

दिनांक : २३/०२/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कर्जत